www.esakal.com

सकाळ

पुणे । रविवार, २६ सप्टेंबर २०१० । किंमत तीन रुपये

# 'वैज्ञानिक उद्योजकता रुजविणे गरजेचे'

**पुणे, ता. २५ :** बाजारातील वस्तुस्थितीची जाण नसल्यामुळे नव्या पिढीच्या सर्जनशील शास्त्रज्ञांचे प्रयोग व संकल्पनांना व्यावसायिक स्वरूप प्राप्त होत नाही. त्यांना योग्य गुंतवणूकदारही मिळत नाही. त्यामुळे संशोधनाचा फायदा सामान्य लोकांपर्यंत पोचत नाही, असे मत केंब्रिज विद्यापीठातील सेंटर फॉर एंटरप्रेन्युअल लर्निंगचे संचालक डॉ. शैलेंद्र व्याक्रनम यांनी व्यक्त केले.

तरुण संशोधकांच्या संकल्पनांना व्यावसायिक जोड देऊन त्यांना उद्योजकाचा दृष्टिकोन देण्यासाठी 'ॲक्सिलरेटेड कमर्शलाइझेशन ऑफ टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन' (ॲक्टिव्ह) या विषयावर आधारित दोन कार्यशाळा राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा (एनसीएल) येथे होत आहेत.

केंब्रिज येथील ॲक्सिलरेटर इंडिया आणि एनसीएलच्या व्हेंचर सेंटरने आयोजित केलेल्या या कार्यशाळा २७ व २८ सप्टेंबर आणि ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर रोजी एन.सी.एल. येथे होणार आहेत. या दोन्ही कार्यशाळांसाठी प्रत्येकी ३० शास्त्रज्ञांची निवड करण्यात आली आहे.